**उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याबाबतची योजना.**

# महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय क्रमांक-रावापु-१०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३,**
मराठी भाषा विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक : १० सप्टेंबर, २०१२**

संदर्भ :
**१) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र.मवापु-१०९४/प्र.क्र.३५०/सां.का.२, दिनांक १ जुलै, १९९५.**
**२) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.मवापु-२००६/प्र.क्र.२०८/सां.का.३, दिनांक २ ऑगस्ट, २००६.**
**३) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.मवापु-२००७/प्र.क्र.१५३/सां.का.३, दिनांक १६ जून, २००७.**
**४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्र.पूरक-२०११/ प्र.क्र.१५०/सां.का.-४ दिनांक १३ एप्रिल, २०१२.**
**५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे पत्र, क्र.उवापु-२०१२/प्र.क्र.२२१/सां.का-४ दिनांक २३ जुलै, २०१२.**

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीचा राज्य पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वीत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील व राज्याबाहेरील ज्या लेखकांनी मराठी भाषेमध्ये वाड्.मय निर्मिती केली आहे अशा लेखकांकडून विविध वाड्.मय प्रकारातील (उदा. काव्य, नाटक, कादंबरी, लघुकथा, ललितगद्य इत्यादी) पुस्तके स्वीकारण्यात येतात. मराठी भाषेतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीसाठी राज्य पुरस्कार देण्याची योजना यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येत होती.

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेशी संबंधित सर्व कार्यालये एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या अधिसूचनेन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेले १) श्री.पु.भागवत पुरस्कार २) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार व ३) उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार हे तीनही पुरस्कार सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच संदर्भीय दिनांक २३ जुलै, २०१२ च्या पत्रान्वये उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याच्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरु करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. या स्पर्धेसाठी पुस्तके स्वीकारणे, त्यांचे परिक्षण करणे, स्पर्धेचा निकाल जाहीर करणे इत्यादी बाबींमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :-

राज्यात मराठी भाषेतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाच्या दिनांक ०१ जुलै, १९९५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. यामध्ये निरनिराळया वाड्.मय प्रकारासाठी पुरस्कार देण्यात येतात. या योजनेंतर्गत पुस्तके स्वीकारणे, त्यांचे परीक्षण करणे, निकाल जाहिर करणे इत्यादी बाबींमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षापासून उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मितीचे राज्य पुरस्कार मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून वितरित केले जाणार आहेत. याबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

-: **मराठी भाषेतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार योजनेचा कालबध्द कार्यक्रम** :-

(१) सन २०१२-२०१३ या वर्षात उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मिती राज्य पुरस्कारासाठी स्वीकारण्यात येणारी पुस्तके **दिनांक १ एप्रिल २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१२** या वर्षात प्रकाशित झालेली असावीत. तसेच सदर कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्तीची पुस्तकेच या स्पर्धेसाठी पात्र असतील.

(२) या पुरस्कारासंदर्भात **दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ पर्यंत** राज्याची महत्वाची वृत्तपत्रे / आकाशवाणी / दूरदर्शन इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेमार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

(३) या राज्य पुरस्कार योजनेमध्ये भाग घेऊ इच्छिणारे लेखक, साहित्यिक, प्रकाशक इत्यादींनी लेखी मागणी केल्यावर, या पुरस्कार योजनेची प्रवेशिका व माहितीपत्रक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे कार्यालयात किंवा संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात **दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२** या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) सदर पुरस्कार योजनेमध्ये भाग घेऊ इच्छिणा-या साहित्यिकांनी त्यांची पुस्तके संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी (मुंबई वगळून) यांच्या कार्यालयाकडे **दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२** या कालावधीत सादर करावीत. संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने ही पुस्तके सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडे पाठवावीत.

(५) **दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२** पर्यंत वाड्.मयीन प्रकारांच्या पुस्तकांची विभागवार छाननी पूर्ण करुन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी **दिनांक ५ नोव्हेंबर, २०१२** पर्यंत याबाबतची माहिती शासनास कळवावी.

(६) **माहे नोव्हेंबर, २०१२ ते डिसेंबर, २०१२** या कालावधीत सदर पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली परिक्षण समितीच्या बैठका आयोजित करुन **माहे जानेवारी, २०१३** च्या पहिल्या आठवडयात निवड समितीच्या अध्यक्षांनी परिक्षण समितीचा निर्णय शासनास सादर करावा.

(७) **माहे जानेवारी, २०१३** मध्ये उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याकरीता विजेत्यांची यादी जाहीर करण्यात येईल.

(८) ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी **दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३** रोजी सदर पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येईल.

२. वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे मराठीतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना सन २०१२-२०१३ या वर्षासाठी अंमलात येईल. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई हे या योजनेचा आढावा शासनास सादर करतील. त्यानुसार सन २०१३-२०१४ व त्यापुढील वर्षासाठी कार्यवाही करण्यात येईल.

३. या योजनेला महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई यांनी महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रातून तीन वेळा ठळक प्रसिध्दी होईल अशी व्यवस्था करावी. त्यासाठी जिल्हास्तरीय कार्यालयांनाही सूचना द्याव्यात. तसेच आकाशवाणी व दूरदर्शन वरुनही तीन वेळा प्रसिध्दी द्यावी. महाराष्ट्राबाहेरील गोवा व नवी दिल्ली येथील प्रसिध्दी केंद्रातही याची माहिती उपलब्ध होईल असे पहावे.

४. उत्कृष्ट मराठी वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याबाबतच्या योजनेसाठी प्रत्येक वाड्.मयीन विभागाकरिता निश्चित करण्यात आलेल्या लेखक / प्रकाशक यांना देण्यात येणारे विविध पुरस्कार व पुरस्काराची रक्कम याबाबतचा सविस्तर तपशील, सदरहू शासन निर्णयाच्या जोडपत्र-१ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. या पुरस्कार योजनेचे नियम जोडपत्र-२ प्रमाणे असतील. तसेच, या पुरस्कार योजनेसाठी स्वीकारण्यात येणाऱ्या प्रवेशिका अर्जाचा नमूना जोडपत्र-३ प्रमाणे व लेखक अथवा प्रकाशकांनी सादर केलेल्या पुस्तकांसाठी दयावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना जोडपत्र-४ प्रमाणे सादर करणे आवश्यक असेल. या पुरस्कार योजने विषयी वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाच्या प्रसिध्दी पत्रकाचा नमुना जोडपत्र-५ येथे दर्शविण्यात आलेला आहे.

५. याप्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्र.झेडएफ-०२, २२०५ - कला व संस्कृती - (०१)(०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन - ५० इतर खर्च (योजनेतर) या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. **हा शासन निर्णय (प्रवेशिका व जोडपत्रांसह) महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "नवीनतम संदेश" या शीर्षकाखाली उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामधील प्रवेशिकांचाही वापर करुन त्या प्रवेशिका इच्छुक लेखकांना त्यांच्या पुस्तकांसह संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करता येतील.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६५५५३७२३३)

(ललिता शि.देठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति :-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
११. सर्व विभागीय आयुक्त ,
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१५. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
१६. वित्त विभाग (व्यय -४ / अर्थसंकल्प -३ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई,
१९. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
२१. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
**२२. भाषा - ३ (संग्रहार्थ).**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी (प्रस्तुत योजनेची माहिती सर्व वृत्तपत्रात तसेच राज्य शासनाच्या सर्व प्रसिध्दी माध्यमाव्दारे यथाप्रस्तावित करावी ही विनंती)** :-

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
२. संचालक, आकाशवाणी, मुंबई,
३. संचालक, दूरदर्शन केंद्र, मुंबई,
४. मुख्य माहिती अधिकारी, महाराष्ट्र माहिती केंद्र, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
५. महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी / गोवा.

## जोडपत्र – १

## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना

या योजनेखाली प्रत्येक वाङमयीन विभागासाठी निश्चित करण्यात आलेले लेखन प्रकार व पुरस्काराची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

### पुरस्कारासाठी विभाग आणि साहित्य प्रकार

### (अ) प्रौढ वाङ्.मय

(१) **काव्य**

कवी केशवसूत पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(२) **नाटक/एकांकिका**

राम गणेश गडकरी पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(३) **कादंबरी**

हरी नारायण आपटे पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(४) **लघुकथा**

दिवाकर कृष्ण पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(५) **ललितगद्य (ललित विज्ञानासह)**

अनंत काणेकर पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(६) **विनोद**

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर .. .. रु.१,००,०००

(७) **चरित्र**

न.चिं.केळकर पुरस्कार रु.१,००,०००

(८) **आत्मचरित्र**

लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(९) **समीक्षा/वाङ्.मयीन संशोधन/सौंदर्यशास्त्र/ललितकला आस्वादपर लेखन**

श्री. के. क्षीरसागर पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(१०) **राज्यशास्त्र/समाजशास्त्र**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार .. .. रु.१,००,०००

(११) **इतिहास**

शाहू महाराज पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१२) भाषाशास्त्र / व्याकरण**

. नरहर कुरुंदकर पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१३) विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह)**

महात्मा ज्योतीराव फुले पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१४) शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह**

वसंतराव नाईक पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१५) दलित साहित्य**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१६) अर्थशास्त्र व अर्थशास्त्रविषयक लेखन**

सी.डी.देशमुख पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१७) तत्वज्ञान व मानसशास्त्र**

ना.गो. नांदापूरकर पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१८) शिक्षणशास्त्र**

कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(१९) पर्यावरण**

डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(२०) संपादीत /आधारीत**

रा.ना.चव्हाण पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(२१) अनुवादित**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार .. .. रु.१,००,०००

**(२२) संकीर्ण (क्रिडा सह)**

भाई माधवराव बागल पुरस्कार .. .. रु.१,००,०००

--------------

**प्रोढ वाड्.मय पुरस्कार एकूण रक्कम --- रु.२२,००,०००/-**

## (ब) बाल वाङ्.मय पुरस्कार

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **कविता** | |
| | बालकवी पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| **(२)** | **नाटक व एकांकिका** | |
| | भा.रा.भागवत पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| **(३)** | **कादंबरी** | |
| | साने गुरुजी पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| **(४)** | **कथा (छोटया गोष्टी, परिकथा, लोककथासह)** | |
| | राजा मंगळवेढेकर पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| **(५)** | **सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे)** | |
| | यदुनाथ थत्ते पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| **(६)** | **संकीर्ण** | |
| | ना.धो.ताम्हणकर पुरस्कार .. .. | रु.५०,००० |
| | **बालवाङ्.मय पुरस्कार एकूण रक्कम --** | **रु.३,००,०००/-** |

## (क) प्रथम प्रकाशन

खालील लेखन प्रकारातील लेखकाचे पहिले प्रसिध्द झालेले पुस्तक म्हणजे, "प्रथम प्रकाशन" समजण्यात येईल. लेखकांनी कृपया प्रवेशिकेत तसा स्पष्ट उल्लेख करावा :-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **काव्य** | | |
| | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |
| (२) | **नाटक/एकांकिका** | | |
| | विजय तेंडूलकर पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |
| (३) | **कादंबरी** | | |
| | श्री. ना. पेंडसे पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |
| (४) | **लघुकथा** | | |
| | ग. ल. ठोकळ पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |
| (५) | **ललितगद्य** | | |
| | ताराबाई शिंदे पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |
| (६) | **समीक्षा सौदर्यशास्त्र** | | |
| | रा.भा.पाटणकर पुरस्कार | .. .. | रु.५०,००० |

**प्रथम प्रकाशन पुरस्कार एकूण रक्कम -- रु.३,००,०००/-**

## (ड) बृहन्महाराष्ट्र पुरस्कार

**बृहन्महाराष्ट्रातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी पुरस्कार**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | .. .. | रु.१,००,००० |

**बृहन्महाराष्ट्र पुरस्कार एकूण रक्कम रु.१,००,०००/-**

## जोडपत्र - २

### मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना

१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत प्रसिध्द झालेल्या पुस्तकांना निवडीअंती राज्य शासन पुरस्कार देते. या योजनेअंतर्गत पुढील साहित्य प्रकारामध्ये पुरस्कार देण्यात येतात :-

**(अ)** **प्रौढ वाङ्.मय - २२ साहित्य प्रकार**
**(ब)** **बाल वाङ्.मय - ६ साहित्य प्रकार**
**(क)** **प्रथम प्रकाशन - ६ साहित्य प्रकार**
**(ड)** **बृहन्महाराष्ट्र पुरस्कार - १ साहित्य प्रकार**

### : नियम :

(१) सन २०११ - २०१२ च्या स्पर्धेसाठी पाठवावयाची पुस्तके **दिनांक ०१ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१२** (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीत प्रकाशित झालेली व प्रत्यक्षात बाजारात उपलब्ध असलेली असावी.

(२) या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारण्याचा शेवटचा **दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२** असा राहील.

(३) ही स्पर्धा महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील सर्व लेखकांसाठी आणि प्रकाशकांसाठी खुली आहे.

(४) या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी कोणतेही स्पर्धा शुल्क नाही. स्पर्धेच्या प्रवेशिकांसाठी आवश्यक प्रवेशिका व माहितीपत्रक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयातही उपलब्ध होतील.

(५) या योजनेखालील स्पर्धेमध्ये ज्या लेखकांना एका विशिष्ट लेखन प्रकारामध्ये तीन वेळा पारितोषिके मिळाली असतील अशा लेखकांना त्याच लेखन प्रकारांमध्ये या स्पर्धेसाठी पुस्तक/ पुस्तके पाठविता येणार नाहीत. मात्र प्रौढ वाङ्.मय तसेच बाल वाङ्.मय प्रकारातील सर्वोत्कृष्ट पुस्तकांनाच ही अट लागू आहे. प्रथम प्रकाशन प्रकारातील पुरस्कारांची त्यात गणना केली जाणार नाही.

(६) पुस्तकांची फक्त **प्रथम आवृत्तीच** स्पर्धेकरीता पात्र ठरेल.

(७) पुस्तकात प्रकाशन **दिनांक, वर्ष छापलेले असणे आवश्यक आहे**. तारखेचा व वर्षाचा **रबरी शिक्का अथवा चिकटवलेली पट्टी ग्राहय धरण्यात येणार नाही.**

(८) **दिनांक १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१२** या कालावधीत प्रकाशित झालेले तथापि कोणत्याही कारणास्तव स्पर्धेत लेखकांकडून अथवा प्रकाशकांकडून दाखल न झालेले पुस्तक हे अन्य व्यक्ती अथवा संस्था यांनी पुरस्कारासाठी पाठविल्यास ते स्वीकारले जाईल. परीक्षण समितीचे अध्यक्ष / सदस्य यांना स्वत:हून एखाद्या लेखकाचे / प्रकाशकाचे पुस्तक दाखल करण्यास परवानगी असेल. मात्र याबाबत **मूळ लेखकाचे / प्रकाशकाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊनच सदर पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात येतील.** ज्या लेखकांची पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात येतील अशा पुस्तकांना या योजनेच्या नियमावलीतील अन्य सर्व नियम लागू असतील. पुस्तक पुरस्कारासाठी योग्य ठरल्यास, पुरस्कार जाहीर करण्यापूर्वी संबंधित लेखक / प्रकाशक यांना पूर्व कल्पना दिली जाईल. अशी पुस्तके योजनेसाठी स्वीकारणे, त्याचा वाङ्.मय प्रकार निश्चित करणे याबाबत अंतिम निर्णय हा परीक्षण समितीचा असेल.

(९) या स्पर्धेसाठी **हस्तलिखित किंवा टंकलिखित पुस्तकांचा** विचार केला जाणार नाही.

(१०) ज्या पुस्तकामध्ये पूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या पुस्तकांमधील काही भागाचा समावेश केला असल्यास, अशी पुस्तके स्पर्धेसाठी पात्र ठरणार नाहीत.

(११) साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांचा या स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

(१२) स्पर्धेसाठी दाखल करावयाच्या पुस्तकाचे लेखक एकापेक्षा अधिक असतील आणि या सर्व सहलेखकांपैकी एखादा लेखक जरी स्पर्धेच्या इतर नियमांप्रमाणे त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास अपात्र ठरत असेल तर ते पुस्तक त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास **अपात्र समजण्यात** येईल.

(१३) दिवंगत लेखकांची प्रवेशिका या स्पर्धेसाठी अपात्र समजली जाईल. तथापि, एखाद्या दिवंगत लेखकाची ती पहिलीच साहित्यकृती असेल व प्रकाशकाचे तसे प्रतिज्ञापत्र असेल आणि ती साहित्यकृती त्या लेखकाच्या निधनाच्या निकटच्या काळात उत्कृष्ट वाङ्.मय निर्मिती स्पर्धेसाठी सादर झाली असल्यास त्या पुस्तकाची प्रवेशिका पात्र ठरविण्यात येईल.

त्याचप्रमाणे आत्मचरित्र या लेखन प्रकारांच्या बाबतीत पुस्तकातील संबंधित लिखाण लेखकाचे स्वत:चे आणि स्वतंत्र आहे अशी माहिती दिवंगत लेखकाच्या निकटच्या नातेवाईकांनी लेखी दिल्यास अशी प्रवेशिका पात्र समजण्यात येईल.

(१४) **प्रवेशिकेतील वाङ्.मय प्रकाराचा उल्लेख अचूकपणे नमूद करणे** आवश्यक आहे.

(१५) एकच पुस्तक **अनेक वाङ्.मय प्रकारात सादर करता येणार नाही.** तसे निदर्शनास आल्यास त्या पुस्तकांचा स्पर्धेसाठी विचार करता येणार नाही.

(१६) अपूर्ण प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(१७) परीक्षण मंडळावर अथवा मंडळ सदस्यांवर दबाव येतो आहे असे सिध्द झाल्यास ज्या प्रवेशिकांबाबत हा दबाव येत असेल ती प्रवेशिका **विचारात घेतली जाणार नाही.**

(१८) ज्या लेखकांना, प्रकाशकांना शिफारसकर्त्यांना या योजनेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्रासोबत आपल्या पुस्तकांच्या **दोन प्रती** पुढील नमुन्यातील अर्जासह संबंधित जिल्हयाच्या **जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटयमंदिर इमारत, दुसरा मजला, पु.ल.देशपांडे अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ यांजकडे पाठवाव्यात.** स्पर्धेसाठी दिलेल्या प्रती स्पर्धकास नंतर परत करण्यात येणार नाहीत.

**टीप** -

(१) कोणत्याही विभागातील लेखन प्रकारांमध्ये अपेक्षित दर्जाचे पुस्तक न आढळल्यास कोणतेही पारितोषिक दिले जाणार नाही. याबाबतचा अंतिम निर्णय निवड समितीचा राहील.

(२) प्रथम प्रकाशन विभागातील एखाद्या लेखन प्रकारातील सर्वोत्कृष्ट पुस्तक मुख्य विभागातील सर्वोत्कृष्ट दोन पुस्तकांपैकी एक ठरल्यास त्या पुस्तकास प्रथम प्रकाशनाचे पारितोषिक न देता फक्त उत्कृष्ट पुस्तकाचे पारितोषिक देण्यात येईल. या लेखन प्रकारातील प्रथम प्रकाशनाचे पारितोषिक अन्य उत्कृष्ट पुस्तकास योग्य वाटल्यास देण्यात येईल.

(३) एखाद्या लेखन प्रकारास स्पर्धेसाठी आलेल्या प्रवेशिकांतून पारितोषिकांसाठी फक्त एकच अपेक्षित दर्जाचे पुस्तक आढळल्यास त्या लेखन प्रकारास एकच पारितोषिक दिले जाईल. याबाबतचा अंतिम निर्णय निवड समितीचा राहील.

........................

## जोडपत्र - ३
## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार
## प्रवेशिका

(१) पुस्तकाचे नाव :

(२) विभाग (अ) प्रौढ वाङ्.मय (२२ साहित्य प्रकार)
(ब) बाल वाङ्.मय (६ साहित्य प्रकार)
(क) प्रथम प्रकाशन (६ साहित्य प्रकार)
(ड) बृहन्महाराष्ट्र पुरस्कार (१ साहित्य प्रकार)

(३) वाङ्.मय प्रकार (पुस्तिकेत दर्शविल्याप्रमाणे) :

(४) लेखकाचे नाव व संपूर्ण पत्ता :

(अ) दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक :
(आ) लेखकाचे ज्या नावे बँकेत खाते आहे ते नाव :
(इंग्रजीमध्ये कॅपिटल अक्षरात)
(बँकेचे नाव किंवा खाते क्रमांक नाही)

(५) प्रकाशकाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक :

(६) प्रकाशन दिनांक :

(७) लेखन संपूर्ण स्वतंत्र आहे का ? :
या प्रकाशनाची ही प्रथम आवृत्ती आहे का? :

(८) ज्या लेखन प्रकारात या पुस्तकाचे वर्गीकरण होते त्या लेखन प्रकारातील पुस्तकांना राज्य शासनाच्या या योजनेअंतर्गत लेखकाला पूर्वी पुरस्कार मिळाला आहे काय ? असल्यास, किती वेळा ? :

(९) या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे काय ? :

(१०) या पुस्तकामध्ये यापूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या पुस्तकातील भाग समाविष्ट आहे काय ? :

(११) सोबत खालील बाबी जोडल्या आहेत काय :
(अ) पुस्तकांच्या दोन प्रती, :
(ब) लेखकाच्या साहित्यक्षेत्रातील कार्याचा व अन्य माहितीचा तपशील २ प्रतींत (फक्त ३० ओळी) व त्यावर चिकटवलेले दोन फोटो आवश्यक आहेत. :
(क) लेखकाचे वा प्रकाशकाचे सोबतच्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (प्रवेशिका पाठविणारे लेखक अथवा प्रकाशक नसल्यास त्यांनी हे प्रमाणपत्र पाठविण्याची आवश्यकता नाही) :
(ड) नियम क्र.१३ लागू होत असल्यास प्रकाशकाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. :

**टीप** - (१) वरील अनुक्रमांक **(३) येथे दर्शविलेल्या वाङ्.मय प्रकाराचे वर्गीकरण चुकीचे नमूद केल्यामुळे प्रवेशिका रद्द होऊ शकते.**
(२) वाङ्.मय प्रकार हा अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिणे आवश्यक आहे.

वरील दिलेली माहिती आणि तपशील सत्य आहे.

( सही )

**प्रवेशिका पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक** . . . . . . . . . .     **प्रकाशक / लेखक / शिफारसकर्ता**

# जोडपत्र - ४

## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङमय निर्मितीस राज्य पुरस्कार लेखक अथवा प्रकाशक यांचे

## प्रमाणपत्र

(१) प्रमाणित करण्यात येते की, ______________________ या पुस्तक प्रकाशनाचा अचूक दिनांक ______________ हा दिनांक परीक्षक, पुस्तक व परीक्षण कार्यालय यांजकडे नोंदविलेल्याप्रमाणे आहे.

(२) ______________________ पुस्तकातील लिखाण स्वत:चे आणि स्वतंत्र आहे.

(३) मराठी भाषेतील उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार या योजनेखाली लेखकाला __________ या लेखन प्रकारातील तीन किंवा अधिक वेळा पारितोषिके मिळालेली नाहीत.

( सही )

लेखक / प्रकाशक

नाव ______________________

रबरी शिक्का

**जोडपत्र - ५**

**प्रसिध्दीपत्रक**

**" राज्य वाङमय पुरस्कार "**

मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेशी संबंधित सर्व संस्था, मंडळे एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक २९.११.२०१० अन्वये स्वतंत्र मराठी भाषा स्थापन करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत मराठी भाषेशी संबंधित कामकाज पाहणारे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ही कार्यालये मराठी भाषा विभागामध्ये वर्ग करण्यात आली आहेत.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे मार्फत वितरीत करण्यात येत असलेले, साहित्य क्षेत्राशी संबंधित १) श्री.पु.भागवत पुरस्कार २) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार व ३) उत्कृष्ट मराठी वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार हे तीनही पुरस्कार सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून वितरीत केले जाण्यासाठी हा विषय मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे.

मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङमय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०११-१२ करिता राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी प्रवेशिका मुंबई वगळता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात **दि. १५ सप्टेंबर, २०१२ ते दि.१५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत** उपलब्ध होतील.

**दिनांक ०१ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च २०१२** या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात तसेच मुंबई वगळता अन्यत्र सर्व जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्व साधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील. **महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "नवीनतम संदेश" या शीर्षकाखाली प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. संकेतस्थळावरील प्रवेशिकांचाही वापर करुन त्या प्रवेशिका इच्छुक लेखकांना त्यांच्या पुस्तकांसह संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करता येतील.** प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई कार्यालयात **दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत** पोहोचेल अशा बेताने पाठवाव्यात.

लेखक / प्रकाशक यांच्या खेरीज अन्य व्यक्तीही या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. तथापि अशाप्रकारे शिफारस करणाऱ्या व्यक्तीने प्रवेशिकेसोबत पुस्तकांच्या दोन प्रती, लेखकाची वैयक्तिक माहिती व लेखकाची दोन छायाचित्रे पाठविणे आवश्यक आहे. या स्पर्धेचा निकाल जाहीर होण्यापूर्वी संबंधित लेखकाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन नंतरच स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येईल. अशी पुस्तके स्वीकारणे, त्याचा वाङ्.मय प्रकार निश्चित करणे याबाबत अंतिम निर्णय हा परीक्षण समितीचा असेल.

मुंबईतील लेखक / प्रकाशकांनी तसेच शिफारस करणाऱ्या अन्य व्यक्तिंनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई येथे पाठवाव्यात. मुंबई वगळता अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी तसेच शिफारस करणाऱ्यांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हे साहित्य **दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत** पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांनी केले आहे.

....................